पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर
डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि११/०५/२०१८.

# प्रेस नोट

**ऑटो रिक्षा मधून मारहाण करून लुटमार करणारी टोळी गुन्हे शाखेकडून जेरबंद.**

दि.११/०५/२०१८:- दि.०८/०५/२०१८ रोजी एका इसमास ऑटो रिक्षामध्ये दौलताबाद भागामध्ये घेवून जाऊन त्यास मारहाण करून त्याचेकडील ओप्पो मोबाईल बळजबरीने हिसकावून घेतला होता. सदर बाबत पोलीस स्टेशन उस्मानपुरा गु.र.न.५०/२०१८ कलम ३९४ भा.द.वि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तांत्रिक साधनांचा वापर तसेच बातमीदारामार्फत मिळालेल्या माहिती वरून सदर गुन्ह्यातील आरोपी हे दिल्लीगेट परिसरामध्ये ऑटोरिक्षा मध्ये बसलेले आहेत. मिळालेल्या माहिती वरून पोलीस उप निरीक्षक विजय जाधव यांनी त्याच्या पथकासह सदर ठिकाणी जावून शोध घेतला असता एका ऑटोरिक्षा मध्ये नामे १) आरेफ खान नसीबखान वय २० वर्ष, रा.फाजलपुरा, औरंगाबाद २) इम्रान खान आमेर पिता सलावत खान वय १८ वर्ष रा.कैसर कॉलनी, औरंगाबाद व ३)विधीसंघर्ष बालक मिळून आले. त्यांना विचारपूस केली असता त्यांनी त्यांचा आणखी एक साथीदार नामे ४)आरेफ रा.दादाकॉलनी यांनी मिळून दि.०८/०५/२०१८ रोजी रेल्वे स्टेशन औरंगाबाद येथून एका इसमास ऑटो रिक्षा क्र. MH-२०-EF-१४७१ मध्ये सोबत घेवून दौलताबाद भागामध्ये नेवून त्यास मारहाण करून त्याचे १०,०००/- रु कि चा ओप्पो कंपनीचा मोबाईल बळजबरीने हिसकावून घेतला असे सांगितल्याने सदर आरोपी व विधीसंघर्ष बालक यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

विधीसंघर्ष बालक याच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली ऑटो रिक्षा MH-२०-EF-१४७१ व आरेफ खान याच्या ताब्यातून ओप्पो कंपनीचा मोबाईल कि.१०,०००/- रु जप्त करण्यात आला आहे.

सदर कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.मिलिंद भारंबे, मा.पोलीस उप आयुक्त(परिमंडळ-२) श्री.राहुल श्रीरामे, सहाय्यक पोलीस आयुक्त(गुन्हे)श्री.रामेश्वर थोरात सहायक पोलीस निरीक्षक श्री.घनश्याम सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक विजय जाधव, सफौ.नसीमखान, पोना/सुरेश काळवने, समद पठाण, पोकॉ/भाऊसिंग चव्हाण व संदीप बिडकर यांनी बजावली आहे.

SD/-
(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर